# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 08 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०८ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- छत्रपती संभाजीनगरसह महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतल्या शासकीय जमिनींचं प्राधिकरणाकडे हस्तांतरण
- आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्यभरात आदेश आणि नियंत्रण प्रणाली स्थापन करण्यात येणार–मुख्यमंत्र्यांची माहिती
- अंबाजोगाई इथलं प्राचीन सकलेश्वर अर्थात बाराखांबी मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित
- पंढरपूर इथे कामदा एकादशीचा चैत्र यात्रा सोहळा भक्तिभावाने साजरा

आणि

- सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी विशेष तपास पथकाद्वारे चौकशी करावी–विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांची उच्च न्यायालयाकडे मागणी

****

छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर आणि पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतल्या शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. या निर्णयामुळे विकास कामांना वेग येण्याची अपेक्षा आहे.

या बैठकीत राज्याचं वाळू–रेती निर्गती धोरण २०२५ जाहीर करण्यात आलं. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं आज घेतला, यामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्याचा तसंच सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी विशेष अभय योजना-२०२५, हे धोरण राबवण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळानं घेतला.

राज्यात नागपूर इथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्याचा निर्णयही या बैठकीत आज घेण्यात आला.

खाजगी अनुदानित आयुर्वेद आणि खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधल्या गट-ब, क आणि ड संवर्गातल्या शिक्षकेतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावानं 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू करण्याचा निर्णयही आज मंत्रिमंडळानं घेतला. याशिवाय, शासकीय आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, योग आणि निसर्गोपचार महाविद्यालयांतल्या कंत्राटी अध्यापकांचं दरमहा एकत्रित मानधन या बैठकीत निश्चित करण्यात आलं.

****

आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्यभरात आदेश आणि नियंत्रण प्रणाली स्थापन करण्यात येणार असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. आज मुंबईत मंत्रालयात या यंत्रणेचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. वातावरणातल्या बदलामुळे आपत्तीच्या पद्धतीही बदलत असल्याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधलं. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

राज्याच्या सर्वच भागात गुंतवणूक व्हावी यासाठी इकोसिस्टीम तयार केली जात आहे, त्यामुळे येत्या पाच वर्षांत राज्याच्या सर्वच भागांचा संतुलित विकास झाल्याचं दिसेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे. बांद्रा कुर्ला संकुलातील जिओ वर्ल्ड सेंटर इथे आयोजित 'इंडिया ग्लोबल फोरम नेक्स्ट २०२५' या कार्यक्रमात ते आज बोलत होते. राज्य सरकारनं केलेल्या सामंजस्य करारांमधले ८५ टक्के करार मार्गी लागत असून उर्वरित करार प्रत्यक्षात येण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं आज एकूण ४ लाख ७ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारांवर सह्या केल्या. रस्ते, रेल्वे, पिण्याचं पाणी, महामार्ग, सागरी किनारा मार्ग, उड्डाणपूल, मेट्रो यासारख्या विविध प्रकल्पांसाठी देशातल्या सार्वजनिक कंपन्यांसोबत हे करार करण्यात आले.

दरम्यान, वाढवण बंदर विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाला राज्य सरकारकडून तीन हजार चाळीस कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, याबाबतचा शासन निर्णय जारी झाला आहे.

****

महाराष्ट्र शासनानं अंबाजोगाई इथलं ऐतिहासिक आणि प्राचीन सकलेश्वर महादेव मंदिर अर्थात बाराखांबी मंदिर हे 'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे या ऐतिहासिक मंदिराच्या संवर्धन आणि संरक्षणास चालना मिळणार असून पर्यटनासही चालना मिळणार आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी याबाबत राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य शासनानं या संदर्भातली अधिसूचना जारी केली आहे.

****

पंढरपूर इथे चैत्री यात्रा कामदा एकादशीचा मुख्य सोहळा आज भाविकांच्या मोठ्या गर्दीत साजरा झाला. सुमारे तीन लाखांहून जास्त भाविकांनी चंद्रभागेत स्नान करून श्री विठ्ठल-रखुमाईचं दर्शन घेतलं. उन्हाची तीव्रता लक्षात घेत भाविकांसाठी मंदिर परिसरात सावली उपलब्ध करून देण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

दरम्यान, पंढरपूर इथं भाविकांच्या गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता-एआय-तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, याबाबतची चाचणी आज पंढरपूरच्या बसस्थानकावर घेण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

पैठण इथे संत एकनाथ महाराज यांच्या समाधीला तसंच नाथ मंदिरातल्या विजयी पांडुरंगाला चंदनाचा लेप लावण्यात आला आहे. दरवर्षी उन्हाळ्यात विजयी पांडुरंग तसंच संत एकनाथ महाराज यांच्या समाधीला चंदन ऊटी लावण्याची प्रथा आहे. मृग नक्षत्र सुरू होईपर्यंत दररोज हा लेप लावण्यात येतो.

****

सोलापूर जिल्ह्यातल्या येरमाळा इथं श्री येडेश्वरी देवीचा चैत्र पौर्णिमा यात्रोत्सव येत्या १२ ते १७ एप्रिल दरम्यान होणार असून, चुनखडी वेचण्याचा मुख्य कार्यक्रम रविवारी तेरा तारखेला होणार आहे. या उत्सवात पशुप्रदर्शन, कुस्त्यांची स्पर्धा, आराधी मेळा, आतिषबाजीसह मिरवणूक, असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

****

परभणी इथं न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि याचिकाकर्ते प्रकाश आंबेडकर यांनी आज औरंगाबाद उच्च न्यायालयाकडे विशेष तपास पथकाद्वारे चौकशीची मागणी केली. विधीज्ञ आंबेडकर यांनी स्वत: न्यायालयात युक्तिवाद केल्यानंतर वार्ताहरांशी संवाद साधला. अशा प्रकरणांमध्ये पुढील कारवाई कुणी करायची याबाबत कायद्यात अपुरेपणा असल्यानं, न्यायालयाने नियमावली तयार करून मार्गदर्शन करण्याची विनंती केल्याचं आंबेडकर यांनी सांगितलं, ते म्हणाले –

**बाईट – विधीज्ञ प्रकाश आंबेडकर**

या प्रकरणी राज्य सरकारच आरोपी असल्यानं न्यायालयाच्या देखरेखीखाली विशेष पथकाने तपास करावा, अशी मागणी न्यायालयाकडे केल्याचं तसंच केंद्रीय अन्वेषण विभाग–सीआयडीलाही या प्रकरणात आरोपी म्हणून समाविष्ट करण्याचा विचार असल्याचंही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ एप्रिलला  होणार आहे.

****

‘आपले सरकार’ या पोर्टलची सेवा येत्या १० ते १४ तारखेपर्यंत, पाच दिवस बंद राहणार आहे. पोर्टलच्या नियमित तांत्रिक देखभालीसाठी ही सेवा बंद राहणार असल्याचं, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळानं एका प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळवलं आहे.

****

देशातली पहिली आंतरराष्ट्रीय ॲग्री हॅकॅथॉन जूनमध्ये पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज विधानभवनात हॅकॅथॉनच्या संकेतस्थळाचं उद्घाटन करण्यात आलं. या स्पर्धेमध्ये कृषी आणि तंत्रज्ञान शाखांचे विद्यार्थी तसंच संगणक अभियंते स्पर्धक म्हणून सहभाग घेऊ शकतील. या स्पर्धेसाठी कृषी क्षेत्रातल्या विविध समस्यांचं आठ प्रकारात वर्गीकरण केलेलं असून त्यावर स्पर्धकांनी उपाययोजना शोधायची आहे.

****

नांदेड इथे आजपासून येत्या १४ तारखेपर्यंत भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. या समता सप्ताहात सामाजिक न्याय विभागाच्या योजना तळागळातल्या लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचं काम सर्वांनी प्राधान्यानं करावं, असं आवाहन जिल्हा जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा फरोग मुकदम यांनी केलं.

****